**<u>न्यायदंडाधिकारी वर्ग १ देवरुख यांचे न्यायालयात, मुक्काम देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.</u>**

**नि.फौ.खटला क्र. ५२/२०२५**

**नि.क्र. ०९**

## <u>दोषारोपपत्र</u>

***<u>मी, श्रीमती आर. आर. कुलकर्णी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख, याद्वारे तुमच्यावर आरोप निश्चित करीत आहे की,</u>***

**आरोपीचे नाव –** जगदिश मनोहर शिंदे,
**वय** – ५४ वर्षे, **व्यवसाय** – कॅटरींग,
**राहणार –** आंगवली,
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**यांचेवर खालील प्रमाणे दोषारोप ठेवणेत येतो की,**

तुम्ही आरोपीने या न्यायालयाच्या स्थळ सीमेत दिनांक १८/०४/२०२५ रोजी १५:३० वाजताच्या दरम्यान मौजे आंगवली, बाजारवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथे फिर्यादी ***(<u>गुन्हयाचे स्वरुप पाहता, फिर्यादीचे नाव गोपनिय ठेवुन येथे नमूद करण्यात येत नाही</u>)*** तिच्या घरातील किचन रुममध्ये काम करत असताना तुम्ही त्यांचे घराचे किचन रुममध्ये हातात लोखंडी कोयती घेवुन अनाधिकाराने प्रवेश करुन फिर्यादी यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करुन तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले म्हणून, तुम्ही त्याद्वारे ***<u>भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७९ अन्वये</u>***, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

दुसरे असे की, उपरोक्त वेळी, ठिकाणी, दिवशी तुम्ही आरोपीने फिर्यादी हिला धमकी देवुन फौजदारी धाकदपटशा दाखविला, म्हणून, तुम्ही त्याद्वारे ***<u>भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३५१ (२) अन्वये</u>***, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात दखलपात्र गुन्हा केला.

तिसरे असे की, उपरोक्त वेळी, ठिकाणी, दिवशी तुम्ही फिर्यादीला ''जीवे मारण्याची'', व ''घरातुन बाहेर पडल्यानंतर हातातील कोयती घराचे कम्पांउंडचे लोखंडी गेटवर मारुन कोयतीचे दोन तुकडे झाले व जसे कोयतीचे दोन तुकडे झाले आहेत तसे तुझे व तुझ्या नवऱ्याचे तुकडे करीन'' अशी धमकी दिली, त्याद्वारे तुम्ही ***भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३५१ (३) अन्वये***, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

चौथे असे की, उपरोक्त वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादी हिचा अपमान केला आहे हे जाणून किंवा त्यांना असे वाटण्याचे कारण आहे की, यामुळे ती सार्वजनिक शांतता भंग करू शकते किंवा इतर कोणताही गुन्हा करू शकते, त्याद्वारे तुम्ही ***भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३५२ अन्वये***, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

शेवटचे असे की, उपरोक्त वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने गुन्हा करण्याच्या उद्देशाने, फिर्यादीच्या घरातील किचन रुममध्ये अनाधीकाराने प्रवेश केला, त्याद्वारे तुम्ही ***भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३२९ (४) अन्वये***, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

सदर गुन्हा माझे कार्यक्षेत्रातील असून तुमच्याविरुध्द या न्यायालयात खटला चालविला जाईल.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.09.17 17:52:04 +0530

**स्थळ – देवरुख** **(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक – १६/०९/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

**प्रमाणपत्र**

आरोपीला आरोप पत्रातील मजकूर त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.09.17 17:52:10 +05'30'

**स्थळ – देवरुख** **(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक – १६/०९/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

- : C E R T I F I C A T E : -

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 16/09/2025 |
| Charge signed by PO. on | :- | 16/09/2025 |
| Charge uploaded on | :- | 17/09/2025 |